# वाचनप्रेरणा दिन उत्साहात

## साहित्यविषयक उपक्रमांनी दिली वाचनाची प्रेरणा

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

वाचन संस्कृती वाढीस लागावी, वाचन प्रेरणा मिळावी, वाचन कौशल्याचा विकास व्हावा, सुप्त गुणांना वाव मिळावा आणि युवकांचा सहभाग वाढावा यासाठी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. साहित्यविषयक विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजऱ्या केलेल्या वाचन प्रेरणादिनी पुस्तकमैत्री वाढवण्यात आली.



**श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शनातील ग्रंथसंपदा पाहताना विद्यार्थी.**

### महापालिका

महापालिकेच्या राजर्षी शाहू स्पर्धा परीक्षा केंद्र, गांधी मैदान येथे मुख्य लेखापाल संजय सरनाईक यांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. राजर्षी शाहू स्पर्धा परिक्षा केंद्राचे विद्यार्थींनी कथाकथन, प्रेरणादायी भाषणे, कविता, पुस्तकाचे विवेचन, प्रयोगशील कथन आदी विषयामधून विद्यार्थ्यांनी वाचनाविषयी प्रेरणा दिली.

यामध्ये जगदीश पाटील यांनी कविता सादर केल्या. श्वेता बेलवलकर यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे चरित्र मनोगतातून सादर केले. भगवान पाटील यांनी थोर विचारवंताचे दाखले दिले. राणी जाधव यांनी व्यक्तिमत्व विकासाच्या अनुषंगाने प्रयोगशील कथन केले. आस्थापना अधीक्षक विजय वणकुद्रे, जनसंपर्क अधिकारी मोहन सुर्यवंशी, ग्रंथपाल उपस्थित होते.

### विवेकानंद कॉलेजमध्ये अभिवाचन

विवेकानंद कॉलेजमध्ये विविध पुस्तकांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हिंदुराव पाटील होते. विनायक टिपुगडे, प्रिया पाटील, अमेय कवठेकर, मधुरा कुलकर्णी, शुभम कुंभार, शिवप्रसाद शेवाळे, निकिता दळवी, शुभांगी भोसले, राजू शेख या विद्यार्थ्यांनी वाचन केले. यामध्ये गडकोट, संतसाहित्य, स्पर्धा परीक्षा, माहिती तंत्रज्ञान, भाषासंस्कृती, शून्यातून विश्व या विषयावरील पुस्तकांचा समावेश होता. यावळी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित चित्रफित दाखवण्यात आली.

### 'कमला'मध्ये ग्रंथ समीक्षण स्पर्धा

कमला कॉलेज येथे ग्रंथ समीक्षण स्पर्धेचे आयोजन केले होते. ग्रंथालय विभागाच्यावतीने उपक्रम राबवण्यात आला. स्पर्धेत विद्यार्थिंनीनी कथा, कादंबरी, चरित्र या ग्रंथांचे परीक्षण केले. तसेच यावेळी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. ग्रंथपाल ऊर्मिला कदम यांनी संयोजन केले.

### 'देशभूषण'मध्ये पुस्तके भेट

देशभूषण विद्यामंदिर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणादिनी शाळेला पुस्तके भेट दिली. ग्रंथपाल मानसी माने यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनाविषयी माहिती दिली. मुख्याध्यापक आर. ए. गाट यांनी मार्गदर्शन केले.

### कोरगांवकर हायस्कूल

सदर बाजारमधील कोरगांवकर हायस्कूलमध्ये मान्यवरांच्या हस्ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्रकाश कदम यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथपाल एस. एम. कामत, एस. आर. देसावळे, एस. एस. आमणे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### श्रीपतराव चौगुले कॉलेज

कोतोली येथील श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये झालेल्या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी वाचनमूल्य वाढवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले होते. प्रदर्शनात सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी पुस्तकांची पाहणी केली. कॉलेजमधील असंख्य विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनास भेट देऊन अद्यापही वाचन संस्कृती टिकून असल्याचे दाखवून दिले. प्राचार्य डॉ. जे. के. पवार यांचे भाषण झाले. ग्रंथपाल डॉ. एम. व्ही. पाटील यांनी प्रास्ताविक केले.